# भुपाळी

उठा उठा हो सकळीक । वाचें स्मरावा गजमुख ।

ऋद्धिसिद्धीचा नायक । सुखदायक भक्तांसी ।।ध्रु० ।।

अंगी शेंदुराची उटी । माथां शोभतसे कीरिटी ।

केशरकस्तुरी लल्लाटी । हार कंठीं साजिरा ।।१।।

कानी कुंडलांची प्रभा । सूर्य-चंद्र जैसे नभा ।

माजी नागबंदी शोभा । स्मरता उभा जवळी तो ।।२।।

कासे पितांबराची धटी । हाती मोदकांची वाटी ।

रामानंद स्मरता कंठीं । तो संकटीं पावतो ।।३।।